२६३

RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक ६(२)] गुरुवार, एप्रिल २१, २०११/वैशाख १, शके १९३३ [पृष्ठे १२, किंमत : रुपये २०.००

असाधारण क्रमांक २९

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.

अनुक्रमणिका

	पृष्ठे
सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.— महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ स्थापन करण्याकरिता अधिनियम	१–१२

दिनांक २१ एप्रिल, २०११ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

ह. बा. पटेल,
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २१ एप्रिल २०११ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ स्थापन करण्याकरिता अधिनियम.

ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ
२०११ स्थापन करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे
चा महा. अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून त्यांनी
अध्या. ११. दिनांक १० मार्च २०११ रोजी महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अध्यादेश, २०११ प्रख्यापित केला होता ;

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या बासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ. **१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ असे म्हणावे.

(२) तो दिनांक १० मार्च २०११ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. **२.** (१) या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) " मंडळ " याचा अर्थ, कलम ३ अन्वये घटीत केलेले महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ, असा आहे ;

(ख) " अध्यक्ष " याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाचा अध्यक्ष, असा आहे ;

(ग) " सदस्य " याचा अर्थ, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाचा सदस्य, असा आहे ;

(घ) " नगरपालिका अधिनियम " याचा अर्थ, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५, असा आहे ; १८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २. १९६५ चा महा. ४०.

(ङ) " मालमत्ता कर " याचा अर्थ संबंधित नगरपालिका अधिनियमांतर्गत निर्धारित केलेला व वसुलीयोग्य असलेला मालमत्ता कर, असा आहे.

(२) या अधिनियमात वापरण्यात आलेले परंतु येथे व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना संबंधित नगरपालिका अधिनियमामध्ये त्यांना नेमून दिलेले ते ते अर्थ असतील.

प्रकरण दोन

महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाची स्थापना.

मंडळाची स्थापना. **३.** (१) या अधिनियमान्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व त्यास नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ म्हणून ओळखले जाणारे एक मंडळ स्थापन करील.

(२) मंडळ हा, अखंड परंपरा व एक सामायिक मुद्रा असलेले निगम निकाय असेल आणि त्याला जंगम व स्थावर अशी दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा किंवा तिचा विनियोग करण्याचा आणि संविदा करण्याचा अधिकार असेल आणि उपरोक्त नावाने त्याला किंवा त्याच्यावर दावा लावता येईल.

मंडळाची रचना. **४.** (१) मंडळ, अध्यक्ष आणि चारपेक्षा कमी नसतील इतक्या इतर सदस्यांचे मिळून बनलेले असेल.

(२) अध्यक्ष हा, सर्वोच्च न्यायालयाचा किंवा उच्च न्यायालयाचा निवृत्त न्यायाधीश किंवा जो राज्य शासनाचा मुख्य सचिव किंवा अतिरिक्त मुख्य सचिव किंवा भारत सरकारचा सचिव होता असा निवृत्त अधिकारी असेल.

(३) इतर सदस्य हे, नगरपालिका प्रशासन, किंवा मालमत्तेचे मूल्यांकन किंवा नागरी कार्ये, नगरपालिका वित्त, अर्थशास्त्र, अभियांत्रिकी, विधी किंवा व्यवस्थापन यांच्याशी संबंधित समस्या हाताळणे या क्षेत्रातील पुरेसे ज्ञान व अनुभव असणाऱ्या व्यक्ती असतील.

अध्यक्ष व सदस्य यांची नियुक्ती आणि अध्यक्ष व सदस्य यांचे वित्तीय संबंध नसणे.

५. (१) राज्यपाल, राज्य शासनाच्या सल्ल्याने, मंडळाचा अध्यक्ष म्हणून एका व्यक्तीची व इतर सदस्यांची नियुक्ती करतील.

(२) मंडळाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तीस, तो, निवास व्यवस्था पुरवणाऱ्या इमारतींच्या बांधकामाच्या व्यवसायात असणाऱ्या आणि अशा इमारतींमधील सदनिकांची विक्री किंवा विनियोग याचा व्यवसाय करणाऱ्या निगम निकायामध्ये किंवा व्यक्तींच्या संघामध्ये किंवा भागीदारी संस्थेमध्ये त्याच्या नावाने किंवा अन्यथा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध धारण करीत असो किंवा नसो - त्यास मंडळाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून आपले कार्य पार पाडत असताना त्याच्या ज्या कोणत्याही आर्थिक किंवा इतर हितसंबंधांना बाधा पोचण्याचा संभव असेल असे कोणतेही आर्थिक किंवा इतर हितसंबंध ठेवता येणार नाहीत.

(३) मंडळाचा अध्यक्ष आणि सदस्य यांच्या नियुक्त्या **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येतील.

(४) मंडळाचा अध्यक्ष व सदस्य म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्ती, पदग्रहण करण्यापूर्वी, नियमांद्वारे विहित केलेल्या नमुन्यानुसार राज्यपालांसमोर शपथ आणि प्रतिज्ञा घेतील व स्वाक्षरी करतील.

(५) मंडळाचा अध्यक्ष म्हणून किंवा सदस्य म्हणून नियुक्त केलेल्या व्यक्तीस आपल्या पदाचा राजीनामा लेखी स्वरूपात स्वतःच्या सहीनिशी राज्यपालांकडे देता येईल.

अध्यक्ष व इतर सदस्य यांना पदावरून दूर करणे.

६. जर तो,—

(क) अमुक्त नादार झाला असेल, किंवा

(ख) राज्य शासनाच्या मते नैतिक अधःपाताचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल दोषसिद्ध झाला असेल, किंवा

(ग) अध्यक्ष म्हणून किंवा सदस्य म्हणून कार्य करण्यास शारीरिकदृष्ट्या आणि मानसिकदृष्ट्या असमर्थ ठरला असेल, किंवा

(घ) अध्यक्ष म्हणून किंवा सदस्य म्हणून त्याचे कर्तव्य पार पाडताना, बाधक रीतीने परिणाम करीत असतील असे वित्तीय किंवा इतर हितसंबंध संपादित करीत असेल, किंवा

(ङ) पदाचा गैरवापर केला असेल की ज्यामुळे तिला पदावर ठेवणे जनहिताच्या दृष्टीने हानिकारक ठरेल,

तर राज्यपालांस, राज्य शासनाच्या शिफारशीवरून, आदेशाद्वारे अध्यक्ष किंवा अन्य कोणताही सदस्य यास त्याच्या पदावरून दूर करता येईल.

अध्यक्ष व इतर सदस्य यांचा पदावधी आणि वेतन व भत्ते आणि सेवाशर्ती.

७. (१) अध्यक्ष व इतर सदस्य, पदग्रहण केल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीकरिता असे पद धारण करतील, परंतु ते पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाहीत :

परंतु, अध्यक्ष किंवा अन्य कोणताही सदस्य,—

(क) अध्यक्षाच्या बाबतीत, पासष्ट वर्षे, आणि

(ख) अन्य कोणत्याही सदस्यांच्या बाबतीत, बासष्ट वर्षे,

पूर्ण झाल्यानंतर असे पद धारण करणार नाही.

(२) अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती, या नियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे असतील.

(३) अध्यक्ष व सदस्य यांना देय असलेले वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर अटी व शर्ती, यामध्ये नियुक्तीनंतर त्यांना हानिकारक होईल असा बदल करण्यात येणार नाही.

(४) कोणत्याही कारणास्तव अध्यक्षाचे पद रिक्त झाल्यास, राज्यपालांस नियमित तत्त्वावर पद भरेपर्यंत, अध्यक्ष पदाचा अतिरिक्त भार धारण करण्यासाठी कोणत्याही सदस्याची नियुक्ती करता येईल.

मंडळाचे मुख्यालय आणि कामकाज.

८. (१) मंडळाचे मुख्यालय, मुंबई येथे असेल आणि मंडळाची बैठक सामान्यपणे मुंबई येथे होईल. तथापि, मंडळाच्या कामाच्या तातडीच्या दृष्टीने आवश्यक वाटेल तर राज्यात अन्य कोणत्याही ठिकाणी त्याच्या बैठका घेण्यात येतील.

(२) मंडळ, नियमांद्वारे विहित केल्याप्रमाणे, त्याच्या बैठकीच्या कामकाजाच्या संबंधात (गणपूर्ती यांसह), कामकाजाच्या अशा नियमांचे अनुसरण करील.

(३) अध्यक्ष, मंडळाच्या बैठकींचे अध्यक्षपद भूषविल आणि अध्यक्ष, कोणत्याही कारणास्तव, मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहू शकला नाही तर, बैठकीला उपस्थित असलेल्या सदस्यांनी त्यांच्यामधून निवडलेला मंडळाचा अन्य कोणताही सदस्य बैठकीचे अध्यक्षपद भूषवील.

(४) मंडळाच्या कोणत्याही बैठकीपुढे आलेल्या सर्व प्रश्नांवर उपस्थित सदस्यांच्या बहुमताने आणि मतदानाद्वारे निर्णय घेण्यात येईल आणि समसमान मते पडल्यास, अध्यक्ष किंवा त्याच्या अनुपस्थितीत अध्यक्षपद भूषविणारी व्यक्ती दुसरे व निर्णायक मत देईल.

(५) अध्यक्ष हा समान दर्जा धारण करणाऱ्यांपैकी प्रथम असेल आणि त्यास मंडळाच्या कामकाजामध्ये आणि प्रशासकीय बाबींमध्ये सर्वसाधारण अधीक्षण करण्याचे आणि निदेश देण्याचे अधिकार असतील - आणि मंडळाने नेमून दिलेले मंडळाचे असे इतर अधिकार आणि कार्ये तो पार पाडील.

रिक्त पद इत्यादींमुळे मंडळाची कार्यपद्धती बेकायदेशीर न ठरणे.

९. मंडळाची कोणतीही कृती किंवा कार्यपद्धती केवळ पुढील कारणास्तव अवैध ठरणार नाही :—

(क) मंडळाच्या रचनेतील कोणतेही रिक्त पद किंवा कोणताही दोष ; किंवा

(ख) मंडळाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून कार्यरत असणाऱ्या व्यक्तीच्या नियुक्तीतील कोणताही दोष; किंवा

(ग) प्रकरणाच्या गुणवत्तेला बाधा न पोहोचवणाऱ्या मंडळाच्या कार्यपद्धतीमधील कोणतीही अनियमितता.

मंडळाचे अधिकारी व कर्मचारी.

१०. (१) मंडळास, राज्य शासन मान्यता देईल अशी अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदे निर्माण करता येतील आणि अशी पदे भरता येतील.

(२) पोट-कलम (१) व पोट-कलम (५)अन्वये नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यांसह सेवेच्या अटी व शर्ती या, राज्य शासनाअंतर्गत येणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या दर्जाशी व वेतनश्रेणीशी समतुल्य असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना लागू असल्याप्रमाणे असतील.

(३) मंडळास,राज्य शासन उपलब्ध करून देईल, असा राज्य शासनाचा कर्मचारीवर्ग घेता येईल आणि त्यास कामावर लावता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये घेण्यात आलेल्या व सेवेत ठेवलेल्या सर्व शासकीय कर्मचाऱ्यांचा, राज्य शासनाच्या सेवेतील त्यांच्या पदावर धारणाधिकार राहील, आणि मंडळातील त्यांचा सेवावधी हा, राज्य शासनाच्या सेवेत ते प्रत्यावर्तित झाल्यानंतर, त्यांची पदोन्नती, वेतनवाढ व निवृत्तिवेतन यासाठी व त्यांच्या सेवेशी निगडीत अन्य बार्बीसंबंधात मोजण्यात येईल.

(५) मंडळाला एक सचिव असेल आणि त्याची नियुक्ती ही, अध्यक्षाच्या नियंत्रणाखाली, व मंडळ विनियमांद्वारे विनिर्दिष्ट करील अशा अधिकारांचा वापर करण्याकरिता आणि अशी कर्तव्ये पार पाडण्याकरिता, राज्य शासनाकडून करण्यात येईल.

(६) मंडळ आदेशाद्वारे निश्चित करील अशा अटी व शर्तींवर त्यांची कार्ये पार पाडीत असताना, मंडळास सहाय्य करण्यासाठी सल्लागार किंवा तज्ञांची समिती मंडळास नेमता येईल.

आकस्मिक खर्चासह वेतन व भत्ते यापोटी केलेला खर्च.

११. (१) अध्यक्ष, सदस्य, सचिव व मंडळाच्या सेवेतील अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन व भत्ते तसेच आकस्मिक खर्च यापोटी होणारा खर्च हा, या अधिनियमाच्या कलम १६ खाली घटित करण्यात आलेल्या नगरपालिका मालमत्ता कर मंडळ निधीतून भागविण्यात येईल.

(२) सामान्य स्वरूपाचे वित्तीय व्यवहार करण्यासाठी होणारा आकस्मिक खर्च उपरोक्त निधीतून भागविण्यात येईल.

प्रकरण तीन

मंडळाची कार्ये.

मंडळाची कार्ये.

१२. या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मंडळ पुढील कार्ये पार पाडील :—

(क) विविध प्रवर्गांच्या मालमत्तांवर मालमत्ता कर बसविण्यासाठी महानगरपालिकेचा आयुक्त किंवा यथास्थिति, नगर परिषदेचा मुख्य अधिकारी यांनी केलेल्या निर्धारणांची लेखापरीक्षा करणे आणि आवश्यक वाटल्यास निर्धारणात सुधारणा करणे आणि असद्भावनेने किंवा स्वेच्छेने चुकीचे मूल्यांकन केल्याचे आढळून आल्यास, संबंधित व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करण्याची शिफारस करणे.

(ख) महानगरपालिकेचे आयुक्त किंवा यथास्थिति, नगर परिषदेचा मुख्य अधिकारी आणि कोणताही मालमत्ता करदाता यांनी संयुक्तपणे प्रतिवेदन केल्यास, मालमत्ता करदाता आणि महानगरपालिका आयुक्त किंवा यथास्थिति, नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी यांच्यामधील विवाद प्रकरणी त्यांना सल्ला देणे किंवा कोणत्याही न्यायालयात प्रलंबित असलेला किंवा नसलेला विवाद सलोख्याने सोडवावा, अशी दोन्ही पक्षांची इच्छा असेल तर, त्यांच्यातील समझोत्याच्या अटी निश्चित करणे. तसेच त्यासाठी मंडळास, राज्य शासनाच्या मान्यतेने, मंडळ ठरवील अशी फी आकारता येईल.

(ग) जेव्हा जेव्हा शासन तसे करणे आवश्यक ठरवील तेव्हा,—

(एक) मालमत्ता कर पद्धतीचे पुनर्विलोकन करणे आणि मालमत्तांचे मूल्यांकन व मालमत्ता कराचे निर्धारण करण्यासाठी योग्य निकष सुचविणे ;

(दोन) मूल्यांकन किंवा निर्धारण प्रक्रियेचा दर्जा राखणे व त्यात पारदर्शकता आणणे यांसाठी आणि मालमत्तांची निःपक्षपातीपणे तुलना करण्यासाठी तसेच त्यांच्या पडताळणीची तपासणी करण्यासाठी मूल्यांकन उघड करणे सुकर व्हावे यासाठी पारदर्शी कार्यपद्धतीची रुपरेषा तयार करणे आणि तिची रचना करणे ;

(तीन) मालमत्ता कराच्या निर्धारणामध्ये नियतकालिक सुधारणा करण्यासाठीच्या विशिष्ट प्रक्रियेची शिफारस करणे ;

(घ) राज्य शासन, मंडळाचा अनुभव विचारात घेऊन, वेळोवेळी आवश्यक करील तेव्हा मालमत्तांचे मूल्यांकन करणे किंवा मालमत्ता कराचे निर्धारण करणे अशा अन्य बाबींवर सल्ला देणे ;

(ङ) जमीन व इमारतींचे मूल्यांकन करण्यातील तज्ज्ञता विकसित करण्याबरोबर मूल्यांकन किंवा मालमत्ता कर निर्धारण क्षेत्रातील अशी अन्य कार्ये पार पाडणे;

(च) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राज्य शासन, निदेश देईल किंवा मंडळास आवश्यक वाटेल असे महानगरपालिका व नगरपरिषदा यांचे अधिकारी व कर्मचारी यांना स्वतः किंवा कोणत्याही संस्थेमार्फत प्रशिक्षण देणे ;

(छ) राज्यातील मालमत्ता कराशी संबंधित माहिती गोळा करणे व तिची नोंद ठेवणे;

(ज) राज्य शासनाने मंडळाकडे पाठविलेल्या अन्य कोणत्याही संबंधित बाबींवर, राज्य शासनास सहाय्य करणे व सल्ला देणे.

लेखे व दस्तऐवज सादर करणे व त्यांची तपासणी करणे.

१३. मंडळास किंवा मंडळाने प्राधिकृत केलेल्या त्याच्या कोणत्याही अधिकाऱ्यांना, नियमाद्वारे विहित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार यांना, मंडळ किंवा असा अधिकारी निश्चित करील अशा कालावधीच्या आत, मंडळासमोर किंवा अशा अधिकाऱ्यांसमोर कोणताही लेखा, नोंदवही किंवा दस्तऐवज सादर करणे किंवा महानगरपालिका आयुक्त किंवा यथास्थिति, नगरपरिषदेचा मुख्य अधिकारी, यांनी मालमत्तेच्या निर्धारणाची लेखापरीक्षा करण्याच्या प्रयोजनार्थ आवश्यक वाटेल अशी त्याच्याशी संबंधित कोणतीही माहिती देणे आवश्यक करता येईल.

जमीन किंवा इमारतीमध्ये प्रवेश करण्याचा अधिकार.

१४. (१) मंडळाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, जेव्हा त्याला तसे करणे लेखी प्राधिकृत करण्यात येईल तेव्हा, कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार यांना अगोदर नोटीस देऊन, महानगरपालिकेच्या आयुक्ताने किंवा, यथास्थिति, नगरपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्याने केलेल्या मालमत्तेच्या निर्धारणाची लेखापरीक्षा करण्यासाठी अशा जमिनीवर किंवा इमारतीत वाजवी वेळेत प्रवेश करता येईल आणि तिची तपासणी किंवा सर्वेक्षण करता येईल किंवा त्याची मोजमापे घेता येतील.

(२) प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याने पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही जमिनीचा किंवा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार यांना लेखी नोटीस दिल्यानंतर, महानगरपालिकेच्या आयुक्ताने किंवा, यथास्थिति, नगरपरिषदेच्या मुख्य अधिकाऱ्याने, मालमत्तेच्या केलेल्या निर्धारणाची लेखापरीक्षा करण्यासाठी, जर त्याला अशा जमिनीवर किंवा इमारतीत प्रवेश करायचा असेल तर, अशा जमिनीचा किंवा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार यांच्याकडून त्यांच्यावर यथोचितरीत्या अशी नोटीस बजावण्यात आल्यानंतर अशा जमिनीवर किंवा इमारतीत प्रवेश करण्यासाठी व तिची

तपासणी किंवा सर्वेक्षण करण्यासाठी किंवा यथास्थिति, तिची मोजमापे घेण्यासाठी, अशा अधिकाऱ्याला वाजवीरीत्या अपेक्षित असतील अशा सर्व सुविधा, देण्यात येतील.

प्रकरण चार

वित्त, लेखे व लेखापरीक्षा.

१५. (१) राज्य शासन, कायद्याद्वारे राज्य विधानमंडळाने या बाबतीत यथोचित विनियोजन केल्यानंतर, त्यांची कार्ये व कर्तव्याच्या प्रयोजनांकरिता राज्य शासनास योग्य वाटतील असे अनुदान व अग्रिम मंडळाला देईल आणि राज्य शासनाला योग्य वाटतील अशा अटी आणि शर्तीवर अशी सर्व अनुदाने आणि अग्रिमे देण्यात येतील. मंडळाला अनुदान व अग्रिमे देणे.

(२) मंडळाला अनुदान देण्याच्या प्रयोजनार्थ मालमत्तेच्या पट्टीयोग्य मूल्याच्या किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याच्या **राजपत्रात** अधिसूचित करण्यात येईल, अशा टक्क्याने उपकर बसविणे, व असा उपकर महानगरपालिका व नगरपरिषदा यांनी गोळा करून राज्य शासनाकडे भरणा करणे, विधिसंमत असेल. राज्य शासन प्रत्येक वर्षी, नियमांद्वारे विहित करील अशा पद्धतीने या कलमाअन्वये गोळा करण्यात आलेल्या उपकराच्या रकमेएवढे अदमासे सहाय्यक अनुदान मंडळाला प्रदान करील.

१६. (१) " नगरपालिका मालमत्ता कर मंडळ निधी " या नावाने एक निधी स्थापन करण्यात येईल आणि त्यामध्ये,— मंडळाचा निधी स्थापन करणे.

(क) हा अधिनियम किंवा त्याखाली तयार केलेल्या नियमान्वये बसविलेले आणि प्राप्त झालेले कोणतेही शासकीय अनुदान व अग्रिम, फी व आकार, जर कोणतेही असल्यास, आणि ;

(ख) राज्य शासनाद्वारे ठरविल्याप्रमाणे अशा इतर साधनांमार्फत मंडळास प्राप्त झालेल्या सर्व रकमा,

जमा करण्यात येतील.

(२) मंडळास प्राप्त झालेल्या सर्व रकमा एक किंवा अनेक राष्ट्रीय बँकांमध्ये जमा करण्यात येतील.

(३) पुढील गोष्टींची पूर्तता करण्यासाठी निधी वापरण्यात येईल :—

(क) मंडळाचे अध्यक्ष व सदस्य, अधिकारी व इतर कर्मचारी यांचे वेतन, भत्ते व इतर पारिश्रमिके ;

(ख) त्यांची कार्ये पार पाडण्याच्या संबंधातील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी लागणारे मंडळाचे इतर खर्च.

१७. नियमांद्वारे विहित करण्यात येईल, अशा रीतीने व अशा वेळी, मंडळाच्या अंदाजित जमा रकमा व खर्च दर्शविणारा, पुढील वित्तीय वर्षाचा अर्थसंकल्प मंडळ तयार करील आणि असा अर्थसंकल्प राज्य शासनाकडे पाठवील. मंडळाचा अर्थसंकल्प.

१८. (१) मंडळ, योग्य लेखे व अन्य संबंधित अभिलेख ठेवील आणि भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याशी विचारविनिमय करून राज्य शासन निश्चित करील अशा नमुन्यात लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करील. मंडळाचे लेखे व लेखापरीक्षा.

(२) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक निश्चित करतील अशा कालांतराने मंडळाच्या लेख्यांची त्यांच्याकडून लेखापरीक्षा करण्यात येईल आणि अशा लेखापरीक्षेच्या संबंधातील कोणताही खर्च मंडळाकडून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांना प्रदेय असेल.

(३) भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक आणि या अधिनियमान्वये, मंडळाच्या लेख्यांच्या लेखापरीक्षेसंबंधात, त्यांनी नियुक्त केलेली कोणतीही व्यक्ती, यांना, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक म्हणून त्यांना शासकीय लेख्यांची लेखापरीक्षा करण्यासंबंधात सर्वसाधारणपणे जे हक्क व विशेषाधिकार असतील तेच हक्क व विशेषाधिकार असतील आणि, विशेषेकरून, पुस्तके, लेखे, संबंधित पावत्या आणि इतर दस्तऐवज व कागदपत्रे यांची मागणी करण्याचा व मंडळाच्या कोणत्याही कार्यालयाची तपासणी करण्याचा हक्क असेल.

(४) मंडळ, भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक किंवा या बाबतीत त्यांनी नियुक्त केलेली अन्य कोणतीही व्यक्ती, यांनी प्रमाणित केलेले मंडळाचे लेखे व त्यावरील लेखापरीक्षा अहवाल एकत्रितपणे दरवर्षी राज्य शासनाकडे पाठवील आणि राज्य शासन, लेखापरीक्षा अहवाल मिळाल्यानंतर, लवकरात लवकर तो, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर ठेवण्याची व्यवस्था करील.

मंडळाने अधिकार व कार्ये सोपविणे.

१९. (१) मंडळास त्याचे कोणतेही अधिकार आणि कार्ये, वित्तीय अधिकार यांसह, मंडळाच्या अध्यक्षाकडे सोपविता येतील.

(२) मंडळास, या बाबतीत, स्वीकृत केलेल्या ठरावाद्वारे मंडळाच्या अन्य कोणत्याही अधिकाऱ्यांना त्याचे कोणतेही अधिकार किंवा कार्ये सोपविता येतील.

अध्यक्ष, सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी लोकसेवक असणे.

२०. मंडळाचा अध्यक्ष आणि प्रत्येक सदस्य किंवा मंडळाचा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये कार्य करीत असताना किंवा कार्य करण्याचे अभिप्रेत असताना, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम १९७ च्या आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ च्या कलम २ च्या खंड (ग) च्या अर्थांतर्गत, लोकसेवक असल्याचे मानण्यात येईल.

१८६० चा ४५. १९७४ चा २. १९८८ चा ४९.

मंडळाच्या निर्णयाच्या विरोधात अपील.

२१. (१) मंडळाच्या कोणत्याही निर्णयाने किंवा आदेशाने व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करता येईल.

(२) उपरोक्तप्रमाणे असेल ते खेरीजकरून, मंडळाच्या कोणत्याही निर्णयाविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध कोणत्याही न्यायालयात अपील किंवा पुनरीक्षण दाखल करता येणार नाही.

(३) उक्त निर्णयाने किंवा आदेशाने व्यथित झालेल्या व्यक्तीस, मंडळाचा निर्णय किंवा आदेश कळविण्यात आल्याच्या दिनांकापासून साठ दिवसांच्या आत प्रत्येक अपील या कलमान्वये दाखल करता येईल :

परंतु, व्यथित व्यक्तीस, साठ दिवसांच्या उक्त कालावधीत अपील दाखल न करण्याकरिता पुरेसे कारण होते अशी उच्च न्यायालयाची खात्री पटल्यास त्यास साठ दिवसांच्या उक्त कालावधीच्या समाप्तीनंतर अपील स्वीकारता येईल.

प्रकरण पाच

नियम आणि विनियम करण्याचा अधिकार.

नियम.

२२. (१) राज्य शासनास, अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनामध्ये मिळून, एकूण ३० दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य

विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल, ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील आणि असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, अशी अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून यथास्थिति, अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येईल किंवा तो अंमलात येणार नाही, तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे उक्त नियमांन्वये पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधीग्राह्यतेस बाधा येणार नाही.

२३. (१) मंडळास,राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असे विनियम करता येतील. विनियम.

(२) राज्य शासनास, अशी मान्यता देताना, त्यास योग्य वाटतील, असे फेरफार आणि फेरबदल करता येतील :

परंतु असे की, फेरफार किंवा फेरबदल करण्यापूर्वी, राज्य शासन, राज्य शासनाने विनिर्दिष्ट केलेल्या, दोन महिन्यांपेक्षा अधिक नसेल, अशा कालावधीत त्यावर त्याचे मत स्पष्ट करण्याची संधी मंडळाला देईल.

(३) राज्य शासनाने मान्यता दिलेले सर्व विनियम **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

प्रकरण सहा

संकीर्ण

२४. मंडळ, या अधिनियमान्वये, अधिकारांचा वापर करताना आणि कार्ये पार पाडताना पारदर्शकतेची सुनिश्चिती करील. मंडळाच्या कार्यातील पारदर्शकता.

१८६० चा ४५. १९७४ चा २. **२५.** मंडळासमोरील सर्व कामकाज, भारतीय दंड संहितेच्या कलम १९३ च्या आणि कलम २२८ च्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल आणि मंडळ हे फौजदारी प्रक्रिया संहिता,१९७३ याच्या कलम ३४५ व कलम ३४६ याच्या प्रयोजनाकरिता दिवाणी न्यायालय असल्याचे मानण्यात येईल. मंडळासमोरील कामकाज न्यायिक कार्यवाही असणे.

२६. या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या नियमांन्वये आणि विनियमांअन्वये सद्भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीकरिता राज्य शासन किंवा मंडळ किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा मंडळाचा कोणताही सदस्य, अधिकारी किंवा इतर कर्मचारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करता येणार नाही. सद्भावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

२७. (१) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कारणांकरिता, अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीकरिता मंडळ निष्प्रभावित करता येईल आणि कलम ४ च्या पोट-कलम (३) मध्ये निर्धारित केलेली कोणतीही अर्हता धारण करणाऱ्या व्यक्तींची मंडळाची कार्ये आणि कर्तव्ये पार पाडण्यासाठी प्रशासक म्हणून नियुक्ती करता येईल : मंडळ निष्प्रभावित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

परंतु, अशी कोणतीही अधिसूचना काढण्यापूर्वी, राज्य शासन, प्रस्तावित निष्प्रभावन करण्याच्या विरोधात प्रतिवेदन करण्यासाठी मंडळाला वाजवी संधी देईल आणि मंडळाच्या, प्रतिवेदनावर कोणतेही असल्यास, विचार करील.

(२) पोट- कलम (१) अन्वये अधिसूचना प्रसिद्ध झाल्यावर मंडळ निष्प्रभावित ठरल्यावर,—

(क) अध्यक्ष व इतर सदस्य, निष्प्रभावनाच्या दिनांकापासून त्यांची सदर पदे रिक्त करतील ;

(ख) या अधिनियमाच्या तरतुदींद्वारे किंवा तरतुदींन्वये मंडळाच्या वतीने सर्व अधिकार, करावयाची कार्ये किंवा पार पाडावयाची कर्तव्ये ही पोट-कलम (३) अन्वये मंडळ पुनर्घटित करण्यात येईपर्यंत अशा प्रशासकाकडून वापरण्यात येतील व पार पाडण्यात येतील ;

(ग) मंडळाच्या मालकीच्या व त्याच्या नियंत्रणात असणाऱ्या सर्व मालमत्ता, पोट-कलम (३) अन्वये मंडळ पुनर्घटित होईपर्यंत, राज्य शासनाकडे, निहित असतील.

(३) पोट- कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेला निष्प्रभावनाचा अवधी समाप्त झाल्यावर किंवा समाप्त होण्यापूर्वी, राज्य शासनास, अध्यक्ष व इतर सदस्यांची नव्याने नियुक्ती करून मंडळ पुनर्घटित करता येईल आणि अशाबाबतीत एखाद्या व्यक्तीने पोट- कलम (२) च्या खंड (क) अन्वये आपले पद रिक्त केले तर ती पुनर्नियुक्तीस अपात्र समजण्यात येणार नाही.

(४) राज्य शासन पोट- कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेची प्रत या कलमान्वये केलेली कोणतीही कारवाई व अशा कारवाईस कारण ठरलेली परिस्थिती याबाबतचा संपूर्ण अहवाल, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे शक्य तितक्या लवकर ठेवील.

राज्य शासनाकडून निदेशन.

२८. (१) मंडळास, त्याची कार्ये पार पाडताना जनहिताच्या धोरणासंबंधांत, राज्य शासन लेखी निदेशन देऊन मार्गदर्शन करील.

(२) असा कोणताही निदेश जनहिताचा अंतर्भाव असणाऱ्या एखाद्या धोरणविषयक बाबीशी संबंधीत आहे किंवा कसे असा कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, त्यावरील राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

अडचणी दूर करणे.

२९. (१) या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या नगरपालिका अधिनियम किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या नियमांच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या नगरपालिका अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणारी अशी कोणतीही गोष्ट, प्रसंग उद्‌भवेल त्यानुसार, आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश, काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली काढण्यात आलेला असा प्रत्येक आदेश तो काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडण्यात येईल.

विवक्षित अधिनियमांची सुधारणा.

३०. या अधिनियमासोबत जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेले अधिनियम त्यात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने व त्या मर्यादेपर्यंत सुधारीत करण्यात येतील.

सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ याचे निरसन व व्यावृत्ती.

३१. (१) महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अध्यादेश, २०११ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २०११ चा महा. अध्या. ११.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना वा आदेश असल्याने मानण्यात येईल.

अनुसूची

(कलम ३० पहा)

मुंबई महानगरपालिका अधिनियमातील सुधारणा.

१८८८ चा मुंबई ३. १. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम २१९ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १८८८चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ यामध्ये कलम २१९अ समाविष्ट करणे.

नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने केलेल्या मूल्यांकनास किंवा पुनरीक्षणास अधीन राहून मूल्यनिर्धारण करणे.

२०११ चा महा. १४. "**२१९अ.** (१) कलमे २१७, २१८, २१८अ, २१८ब, २१८ बअ, २१८क, २१८ड, २१८ई आणि २१९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने (यात यापुढे ज्याचा निर्देश "नगरपालिका मालमत्ता कर मंडळ" असा करण्यात आला आहे) केलेल्या मूल्यांकनाच्या किंवा पुनरीक्षणाच्या अधीन असेल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य यांची निश्चिती किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेला किंवा आकारलेला कर या विरूद्ध करावयाचे अपील, ज्यावेळी अशा पट्टीयोग्य मुल्याची किंवा भांडवली मुल्याची किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेल्या अथवा आकारलेल्या कराची विषयवस्तू ही नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या विचाराधीन असेल, त्यावेळी लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीकडे करता येणार नाही ; आणि जर असे कोणतेही अपील कलम २१८क अन्वये यापूर्वीच दाखल करण्यात आले असेल अथवा संदर्भाधीन असेल तर ते मंडळाने कार्यवाही सुरू केल्यानंतर नगरपालिका मालमत्ता कर मंडळाकडे हस्तांतरित केल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यावर कार्यवाही करण्यात येईल.".

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यामधील सुधारणा.

१९४९ चा मुंबई ५९. २. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ४१३ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४९चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम ४१३क समाविष्ट करणे.

नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने केलेल्या मूल्यांकनास किंवा पुनरीक्षणास अधीन राहून मूल्यनिर्धारण करणे.

२०११ चा महा. १४. "**४१३क.** (१) कलमे ४०६, ४०७, ४०८, ४०९, ४१०, ४११, ४१२ आणि ४१३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने (यात यापुढे ज्याचा निर्देश "नगरपालिका मालमत्ता कर मंडळ" असा करण्यात आला आहे) केलेल्या मूल्यांकनाच्या किंवा पुनरीक्षणाच्या अधीन असेल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य यांची निश्चिती किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेला किंवा आकारलेला कर या विरुद्ध करावयाचे अपील, ज्यावेळी अशा पट्टीयोग्य मूल्याची किंवा भांडवली मूल्याची किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेल्या अथवा आकारलेल्या कराची विषयवस्तू ही नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या विचाराधीन असेल, त्यावेळी जिल्हा न्यायाधीशाकडे करता येणार नाही ; आणि जर असे कोणतेही अपील कलम ४१० अन्वये यापूर्वीच दाखल करण्यात आले असेल अथवा संदर्भाधीन असेल तर ते मंडळाने कार्यवाही सुरू केल्यानंतर नगरपालिका मालमत्ता कर मंडळाकडे हस्तांतरित केल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यावर कार्यवाही करण्यात येईल.".

नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यामधील सुधारणा.

सन १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ यामध्ये कलम १३४क समाविष्ट करणे.

१९५०चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

३. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम १३४ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने केलेल्या मूल्यांकनास किंवा पुनरीक्षणास अधीन राहून मूल्यनिर्धारण करणे.

२०११चा महा १४.

" **१३४क.** (१) कलमे १२४, १२६, १२७, १२८, १२९, १३०, १३१ आणि १६९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने (यात यापुढे ज्याचा निर्देश " नगरपालिका मालमत्ता कर मंडळ " असा करण्यात आला आहे) केलेल्या मूल्यांकनाच्या किंवा पुनरीक्षणाच्या अधीन असेल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य यांची निश्चिती किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेला किंवा आकारलेला कर या विरुद्ध करावयाचे अपील, ज्यावेळी अशा पट्टीयोग्य मूल्याची किंवा भांडवली मूल्याची किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेल्या अथवा आकारलेल्या कराची विषयवस्तू ही नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या विचाराधीन असेल, त्यावेळी जिल्हा न्यायालय, नागपूरकडे करता येणार नाही ; आणि जर असे कोणतेही अपील यापूर्वीच दाखल करण्यात आले असेल अथवा संदर्भाधीन असेल तर ते मंडळाने कार्यवाही सुरू केल्यानंतर नगरपालिका मालमत्ता कर मंडळाकडे हस्तांतरित केल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यावर कार्यवाही करण्यात येईल.".

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यामधील सुधारणा.

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० यामध्ये कलम १७२क समाविष्ट करणे.

१९६५ चा महा. ४०.

४. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ याच्या कलम १७२ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने केलेल्या मूल्यांकनास किंवा पुनरीक्षणास अधीन राहून मूल्यनिर्धारण करणे.

२०११ चा महा १४.

" **१७२क.** (१) कलमे ११३, ११४, ११५, ११७, ११९, १२०, १२२, १२३, १२४, १६९ १७०, १७१ आणि १७२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य, महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळ अधिनियम, २०११ याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने (यात यापुढे ज्याचा निर्देश " नगरपालिका मालमत्ता कर मंडळ " असा करण्यात आला आहे) केलेल्या मूल्यांकनाच्या किंवा पुनरीक्षणाच्या अधीन असेल.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य यांची निश्चिती किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेला किंवा आकारलेला कर या विरुद्ध करावयाचे अपील, ज्यावेळी अशा पट्टीयोग्य मूल्याची किंवा भांडवली मूल्याची किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेल्या अथवा आकारलेल्या कराची विषयवस्तू ही नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या विचाराधीन असेल, त्यावेळी कलम १६९ च्या पोट-कलम (२) अन्वये रचना केलेल्या मालमत्ता कर अपील समितीकडे करता येणार नाही ; आणि जर असे कोणतेही अपील कलम १७१ अन्वये यापूर्वीच दाखल करण्यात आले असेल अथवा संदर्भाधीन असेल तर ते मंडळाने कार्यवाही सुरू केल्यानंतर नगरपालिका मालमत्ता कर मंडळाकडे हस्तांतरित केल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यावर कार्यवाही करण्यात येईल.".

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.